नियमीत फौ. ख. क्र. ३१/२०१७
सरकार -वि.- देविदास
नि.क्र. ६५.

सरकार तर्फे साक्षीदार क्र. ३ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - योगेश रामचंद्र खोडनकर,
वय ५२ वर्षे, व्यवसाय – वन परिक्षेत्र अधिकारी,
राहणार – लाडखेड, परिक्षेत्र ता.जि. यवतमाळ

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत</u>**

१. दि.०३.०४.२०१६ रोजी मी दक्षिण उमरेड मुख्यालय सिर्सी येथे वन परिक्षेत्र अधिकारी म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी मी व माझे सहकारी वनपाल व वनरक्षक यांच्यासह रात्र गस्तीकरिता जामडोह तलाव क्षेत्र क्र. ३७९ मध्ये निघालो. त्यावेळी मध्यरात्री सकाळी २.०० वा. काही संशयित मोटरसायकल आम्हाला पांजरेपार फाट्याजवळ येताना दिसले. त्या मोटरसायकल क्षेत्र क्र. ३७९ कडून येत असल्याचे दिसले. संशयित वाटल्याने मी वनपाल व वनरक्षक यांना निर्देश दिले की, त्या मोटरसायकला थांबवून चौकशी करा. त्या मोटरसायकल संरक्षीत वन परीसरात अवैधरित्या रात्रीच्या वेळेस आढळून आल्याने त्यांची चौकशी केली. त्यावेळी वनपाल व वनरक्षक यांनी येणाऱ्या मोटरसायकला थांबविण्याचा इशारा केला असता प्रथम येणारी मोटरसायकलने त्यांना हुलकावनी देवून पळून गेला. त्यानंतर आम्ही सावध दबा धरुन बसलो. त्यावेळी मागून येणाऱ्या मोटरसायकलचे लाईट दिसले. तेव्हा आम्ही दबा धरुन अचानक त्या मोटरसायकला पकडले. वनरक्षक मुन्ना रंगारी यांनी त्या मोटरसायकलची झडती घेतली. त्या मोटरसायकलवर दोन व्यक्ती होते. मोटरसायकल चालकाला त्याचे नाव विचारता त्याने त्याचे नाव नामदेव सांगितले व मागील बसलेल्या व्यक्तीचे नाव संजय सांगितले. त्यानंतर मोटरसायकलवर त्यांच्याकडे असलेल्या पिशवीची झडती घेतली असता त्यामध्ये कोयता, सुरा, कुऱ्हाड, टॉर्च, बारुदची बॉटल व छऱ्यांची बॉटल व इतर किरकोळ सामान जे शिकारीकरिता वापरता येवू शकते. त्या व्यक्तींना त्या सामानाबाबत विचारले असता त्यांनी मासे पकडण्याकरिता वापरतात असे सांगीतले. त्या व्यक्तीकडे मासे पकडण्याचे कोणतेही जाळे आढळून आले नाही. त्यामुळे ते व्यक्ती शिकारीकरिता

आले आहे असे संशय आला. त्यादरम्यान पुन्हा एक मोटरसायकल येताना दिसली तिला थांबविले त्या मोटारसायकलवर दोन व्यक्ती होते. त्या मोटारसायकल चालकाला त्याचे नाव विचारता त्याने देविदास असे सांगितला व मागे बसलेल्या व्यक्तीचे नाव लक्षात आले नाही, परंतु, त्याच्याकडे एक बोरीमध्ये काहीतरी असल्याचे आढळले. तेव्हा त्या बोरीची पाहणी केली असता तो व्यक्ती पळून गेला. त्यानंतर मोटरसायकल चालकाला त्याचे नाव विचारता त्याने त्या पळून गेलेल्या व्यक्तीचे नाव शिवदास सांगितले. त्या बोरीमध्ये एक शिकार केलेले हरीण, एक ससा असे मृतावस्थेत आढळून आले. त्यांच्या चौकशी दरम्यान मागून पुन्हा दोन मोटारसायकल येताना दिसल्या, परंतु, त्या आम्हाला पाहून मागच्या दिशेने पळून गेले.

२. त्यानंतर रात्रीचे २.३० वाजल्यामुळे ती जागा कारवाई करण्याकरिता योग्य नसल्याने मी मोटारसायकलवर पकडलेल्या तिन्ही व्यक्तींना तसेच त्यांच्यासह जप्त केले हत्यारे व मृतावस्थेतील आढळलेले हरीण व ससा घेवून खाजगी वाहनाने आम्ही उमरेड येथील वन विकास आगारच्या डेपोमध्ये खेडी आगार येथे आणले. मोटारसायकल आम्ही घटनास्थळावर सोडल्या. त्यानंतर आम्ही वरिष्ठांना फोनद्वारे माहिती दिल्यानंतर सकाळी ५.०० ते ५.३० वा. दरम्यान वरिष्ठ अधिकारी आले त्यानंतर मी वरिष्ठ अधिकारी व पंचांसह पुन्हा घटनास्थळी गेलो. तेथे पंचांसमक्ष घटनास्थळाचा पंचनामा तयार केला. आता मला दाखविलेला निशाणी ५८ वरील मोक्का पंचनामा तोच आहे. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यानंतर गुन्हा नोंद केला. तो गुन्हा क्रमांक पी.ओ.आर. ०१/१२/३ ने नोंद केला. सर्वप्रथम आरोपींना अटक करुन तसा अटक पंचनामा तयार केला. त्यानंतर मृत हरीण व ससा यांचा पंचांसमक्ष मरणोत्तर पंचनामा तयार केला. आता मला दाखविलेला निशाणी ५९ वरील पंचनामा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यानंतर जप्त केलेले हत्यारे जप्त करुन पंचांसमक्ष जप्ती पंचनामा तयार केला. आता मला दाखविलेला निशाणी ६० वरील हत्यार जप्ती पंचनामा तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

३. त्यानंतर मृत प्राण्यांचे नियमानुसार विल्हेवाट लावण्यात आली व तसा पंचनामा तयार करण्यात आला. आता मला दाखविलेला निशाणी ६२ वरील पंचनामा तोच आहे. त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यानंतर आरोपींचा अटक पंचनामा तयार केला आता मला दाखविलेले अटक पंचनामा तोच आहे. त्यावर माझी व पंचाची सही आहे. तो पंचनामा निशाणी ६३ वर आहे. त्यानंतर आरोपींचे हाताचे ठसे घेण्यात आले. ते ठसे पंचासमक्ष घेण्यात आले होते. आता मला दाखविलेले देविदास ह्याच्या हाताचे ठसे तेच आहे. त्यावर माझी व पंचांची सही आहे. तसेच वन्य जीवरक्षक यांची सही आहे. त्यास **निशाणी ६६** देण्यात येते. आता मला दाखविलेले संजय ह्याच्या हाताचे ठसे तेच आहे. त्यावर माझी व पंचांची सही आहे. तसेच वन्य जीवरक्षक यांची सही आहे. त्यास **निशाणी ६७** देण्यात येते. आता मला दाखविलेले नामदेव रामसिंग राठोड ह्याच्या हाताचे ठसे तेच आहे. त्यावर माझी व पंचांची सही आहे. तसेच वन्य जीवरक्षक यांची सही आहे. त्यास **निशाणी ६८** देण्यात येते. आता मला घटनास्थळाचा नकाशा दाखविण्यात आला तो तोच आहे व त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यास **निशाणी ६९** देण्यात येत आहे.

४. त्यानंतर मी आरोपींचे बयाण साक्षीदारांसमक्ष नोंदविले. आता मला देविदास धन्नु पवार ह्याचे बयाण दाखविण्यात आले ते त्याच्या सांगण्याप्रमाणे लिहीण्यात आले होते त्यावर माझी, आरोपीची व साक्षीदारांची सही आहे. ते बयाण वन जीव रक्षक यांच्या समक्ष नोंदविण्यात आले होते ते तेच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ७०** देण्यात येत आहे. आता मला नामदेव रामसिंग राठोड ह्याचे बयाण दाखविण्यात आले ते त्याच्या सांगण्याप्रमाणे लिहीण्यात आले होते त्यावर माझी, आरोपीची व साक्षीदारांची सही आहे. ते बयाण वन जीव रक्षक यांच्या समक्ष नोंदविण्यात आले होते ते तेच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ७१** देण्यात येत आहे. आता मला संजय जवाहरलाल जाधव ह्याचे बयाण दाखविण्यात आले ते त्याच्या सांगण्याप्रमाणे लिहीण्यात आले होते त्यावर माझी, आरोपीची व साक्षीदारांची सही आहे. ते बयाण वन जीव रक्षक यांच्या समक्ष नोंदविण्यात आले होते ते तेच आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यास **निशाणी ७२** देण्यात येत आहे. त्यानंतर जप्त केलेले मोटारसायकल व साहीत्य वनरक्षक यांच्याकडे सुपुर्द केले व तसा सुपुर्दनामा

तयार केला. आता मला दाखविलेला सुपुर्दनामा तोच आहे त्यावर माझी व पंचांची सही आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यास **निशाणी ७३** देण्यात येत आहे. त्यानंतर मी साक्षीदारांचे व पंचांचे बयाण नोंदविले चौकशी अंती तक्रार न्यायालयात दाखल केली. आता मला दाखविलेली तक्रार तीच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा आहे. त्यास **निशाणी ७४** देण्यात येत आहे. आता मला दाखविलेला पि.ओ.आर. तोच आहे. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर खरा आहे. त्यास **निशाणी ७५** देण्यात येत आहे. मी आरोपी व जप्त हत्यारांचे फोटो काढले होते आता मला दाखविलेले फोटो तेच आहे. त्यास **आर्टिकल 'ए एफ १' ते 'ए एफ १८'** देण्यात येत आहे.

५. जप्त केलेल्या वस्तु मला दाखविल्यास मी ओळखू शकतो. आता मला जप्त केलेले **आर्टिकल 'ए' ते 'ई'** पाच सुरे दाखविण्यात आले. ते तेच आहे. आता मला आर्टिकल 'एफ' ते 'आय' चार लोखंडी सत्तु दाखविण्यात आले. ते तेच आहेत. आता मला आर्टिकल 'जे' ते 'एम' चार लोखंडी काणस दाखविण्यात आले ते तेच आहेत. आता मला आर्टिकल 'एन' एक पेचकस दाखविण्यात आला. ते तेच आहे. आता मला आर्टिकल 'ओ' जप्त केलेले तारचा गुच्छा दाखविण्यात आला. आता मला आर्टिकल 'पी' व 'क्यु' जप्त केलेल्या दोन कुऱ्हाडी दाखविण्यात आल्या. त्या त्याच आहे. आता मला आर्टिकल 'आर' ते 'एस' जप्त केलेल्या दोन प्लॅस्टीकचे बॉटल दाखविण्यात आले त्यामध्ये लोखंडी छर्रे आहेत. त्या त्याच आहेत. आता मला आर्टिकल 'टी' ते 'यु' प्लॅस्टीकच्या दोन बॉटल दाखविण्यात आल्या त्यामध्ये बारुद पावडर आहे. आता मला आर्टिकल 'व्ही' प्लॅस्टीकची एक छोटी बॉटल दाखविण्यात आली त्यामध्ये कापूस आहे. आता मला आर्टिकल 'डब्ल्यू' जप्त केलेली टॉर्च दाखविण्यात आली. ती तीच आहे. आता मला आर्टिकल 'एक्स' जप्त केलेली एक लहाण प्लॅस्टीकची बॉटल दाखविण्यात आली. त्यामध्ये एक बॅटरीचा लाईट आहे. आता मला आर्टिकल 'वाय'जप्त केलेली एक प्लॅस्टीकची पाण्याची बॉटल दाखविण्यात आली. ती तीच आहे. आता मला जप्त केलेला आर्टिकल 'झेड' एक रबरी ट्युबचा तुकडा दाखविण्यात आला. आता मला आर्टिकल 'एए' जप्त केलेली लोखंडी मोठी काणस दाखविण्यात आली ती तीच आहे. आता मला आर्टिकल 'एबी' ते 'एडी' जप्त केलेल्या मोटार सायकलच्या फोटो दाखविण्यात आले. त्या

त्याच जप्त केलेल्या मोटार सायकलचे फोटो आहेत. आता मला आर्टिकल 'एई' जप्त केलेली पांढऱ्या रंगाची प्लॅस्टीकची गोणी दाखविण्यात आली. ती तीच आहे.

सरतपास संपला.

**<u>उलट तपास आरोपींतर्फे त्यांचे वकील श्री. खाणोरकर यांचे तोंडी विनंतीवरुन उलट तपास तहकुब करण्यात येत आहे -</u>**

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक १४.०७.२०२५.

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.